## गोपनियता धोरण

*Disclaimer: In the event of any discrepancy or conflict in the translated version, the English version will prevail over the translation.*

www.paisabazaar.com आणि “मोबाइल ॲप” (एकत्रितपणे “वेबसाइट”) या ऑनलाइन प्लॅटफॉर्म/प्लॅटफॉर्म्सचा समावेश असलेली पैसाबझार मार्केटिंग अँड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड (“पैसाबझार”/”कंपनी”/”पैसाबझार.कॉम”) तुमची गोपनियता राखण्याचे महत्त्व ओळखते. पैसाबझार.कॉम त्यांच्या वापरकर्त्यांच्या सर्व माहितीची गोपनियता, अखंडितता आणि सुरक्षितता कायम राखण्यासाठी वचनबद्ध आहे. आवश्यकतेच्या आधारावर वेबसाइटच्या वापराद्वारे तुमच्याकडून मिळालेली काही माहिती पैसाबझार.कॉम कशाप्रकारे संकलित करते, संग्रहित करते, हाताळते आणि हस्तांतरित करते याचे वर्णन हे गोपनियता धोरण करते. हे गोपनियता धोरण आमच्या वेबसाइटला भेट देणाऱ्या व्यक्तींना आणि आमच्या विद्यमान व भविष्यकाळातील ग्राहकांना लागू होते. आमच्या वेबसाइटला भेट देऊन आणि/किंवा वेबसाइटचा वापर करून तुम्ही या गोपनियता धोरणामध्ये वर्णन केलेली कार्यप्रणाली स्वीकारत आहात आणि तिला संमती देत आहात.

वेबसाइटचा वापर करून किंवा वापर पुढे सुरू ठेवून तुम्ही, पैसाबझारने त्यांच्या एकमात्र विवेकाधिकारात वेळोवेळी सुधारित केलेल्या या गोपनियता धोरणानुसार आम्ही तुमच्या माहितीचा वापर (माहिती तंत्रज्ञान कायदा 2000, लागू असलेले नियम, अधिसूचना इ. अंतर्गत परिभाषित केलेल्या संवेदनशील वैयक्तिक माहितीसहित) करण्यास तुम्ही सहमती देता.

### 1. वैयक्तिक माहितीचे नियंत्रक

पैसाबझार मार्केटिंग अँड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेडद्वारे तिच्या पालक कंपनीसहित (तिचे प्रतिनिधी, संलग्नित कंपन्या आणि व्यवसाय भागीदार यांचेसहित) तुमचा वैयक्तिक डेटा/माहिती संकलित केली जाईल आणि भारतातील सर्व्हर्सवर ती संग्रहित केली जाईल.

### 2. आम्ही तुमच्याबद्दलची कोणती वैयक्तिक माहिती संकलित करतो

- आम्हाला ग्राहकांकडून मिळालेल्या माहितीमुळे वेबसाइटवरील तुमचा अनुभव व्यक्तिगत बनवण्यास आणि निरंतर सुधारण्यास मदत होते. आम्ही संकलित करत असलेल्या माहितीचे प्रकार येथे दिले आहेत.

  तुम्ही आमच्या वेबसाइटवर प्रविष्ट केलेली किंवा अपलोड केलेली किंवा तुम्ही निवडलेल्या प्रॉडक्ट किंवा सेवेच्या अनुषंगाने इतर कुठल्याही प्रकारे आम्हाला दिलेली आणि आम्हाला किंवा आमच्या व्यवसाय भागीदारांना आवश्यक असलेली कुठलीही माहिती किंवा दस्तावेज, ज्यामध्ये तुमचे नाव, आडनाव, ईमेल ॲड्रेस, जन्मतारीख, निवासी शहर इ. तपशील असलेली तुमची वैयक्तिक माहिती आम्हाला मिळते आणि आम्ही ती संग्रहित करतो. काही माहिती न पुरवण्याचा पर्याय तुम्ही निवडू शकता पण नंतर तुम्ही आमच्या कितीतरी सेवांचा आणि वैशिष्ट्यांचा लाभ घेऊ शकणार नाही. आम्ही तुमची जैविक माहिती संकलित करत नाही आणि संग्रहितही करत नाही.
- आम्हाला तुमचा कॅमेरा, मायक्रोफोन, स्थान आणि मोबाइल फोन यांचा एक वेळ वापर करण्याचीपरवानगी देखील मिळू शकते आणि अशी माहिती, तुमच्या स्पष्ट संमतीने, आरबीआयने जारी केलेल्या आणि वेळोवेळी सुधारित केलेल्या डिजिटल कर्जाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, केवळ ग्राहकांच्या खऱ्या ओळखीचे सत्यापन किंवा KYC संदर्भातील आमच्या किंवा आमच्या भागीदाराच्या आवश्यकता पूर्ण करण्याच्या उद्देशाकरिता संग्रहित करू शकतो.
- आम्हाला तुमच्याबाबतची माहिती इतर स्त्रोतांकडून देखील मिळू शकते, जी आम्ही आमच्या अकाउंटसंबंधीच्या माहितीमध्ये समाविष्ट करू शकतो.

### 3. आम्ही कुकीज संकलित करतो

-

तुम्ही जेव्हा आमच्याशी संपर्क साधता तेव्हा आम्हाला काही प्रकारची माहिती मिळते जी आम्ही संग्रहित करतो. उदाहरणार्थ, जसे, आम्ही “कुकीज”चा वापर करतो आणि जेव्हा तुमचा वेब ब्राऊजर वेबसाइटचा किंवा वेबसाइटने अथवा वेबसाइटच्या वतीने इतर वेबसाइट्सवर दिलेल्या जाहिराती किंवा इतर सामग्रीचा वापर करतो, तेव्हा आम्हाला काही प्रकारची माहिती प्राप्त होते. कुकीज म्हणजे, वापरकर्त्याच्या संगणकामध्ये त्याच्यासंबंधीच्या माहितीशी जोडलेला डेटाचा एक संग्रहित केलेला भाग असतो. आम्ही सेशन आयडी कुकीज आणि स्थायी (persistent) कुकीज अशा दोन्ही कुकीजचा वापर करू शकतो. तुम्ही तुमचा ब्राउजर बंद केला किंवा लॉग आऊट केले की सेशन आयडी कुकीज संपुष्टात येतात किंवा संगणकाच्या मेमरीमधून पुसल्या जातात. तर स्थायी कुकीज म्हणजे तुमच्या संगणकाच्या हार्ड ड्राइव्हवर दीर्घ कालावधीकरिता

संग्रहित केलेली एक लहान टेक्स्ट फाईल असते. वापरकर्ता जेव्हा वेबसाइटला भेट देतो तेव्हा त्याची प्राधान्ये काय आहेत हे पाहण्याकरिता सेशन आयडी कुकीजचा वापर पैसाबझार.कॉम करू शकतात. भार कालावधी कमी करण्यासाठी आणि सर्व्हरची प्रक्रिया वाचविण्यासाठी देखील त्यांची मदत होते.

नवीन कुकीज स्वीकारण्यापासून तुमच्या ब्राउजरला कसे रोखायचे, जेव्हा तुम्हाला नवीन कुकी मिळते तेव्हा ब्राउजरने तुम्हाला कशाप्रकारे सूचित करायचे आणि कुकीज पूर्णपणे कशा बंद करायच्या हे तुम्हाला अधिकांश ब्राउजर्स सांगतील. याशिवाय, ॲड-ऑनच्या सेटिंगमध्ये बदल करून किंवा त्याच्या निर्मात्याच्या वेबसाइटला भेट देऊन, ब्राउजर ॲड-ऑनद्वारे वापरलेल्या डेटासारखा, म्हणजे फ्लॅश कुकीजसारखा डेटा तुम्ही बंद करू शकता किंवा काढून टाकू शकता.

तथापि, कुकीजमुळे तुम्ही वेबसाइटच्या काही अत्यावश्यक वैशिष्ट्यांचा लाभ घेऊ शकत असल्याकारणाने आम्ही शिफारस करतो की तुम्ही त्यांना चालू स्थितीत राहू द्यावे. उदाहरणार्थ, तुम्ही आमच्या कुकीज ब्लॉक केल्या किंवा अन्यथा नाकारल्या तर ज्यासाठी तुम्ही साइन इन करण्याची आवश्यकता आहे अशी वेबसाइटची प्रॉडक्ट्स किंवा सेवा तुम्ही वापरू शकणार नाही.

**4. आम्ही माहितीचा वापर कसा करतो**

-

जेव्हा तुम्ही अकाउंटकरिता रजिस्टर करता, जेव्हा तुम्ही त्यांच्या प्रॉडक्ट्स किंवा सेवांचा वापर करता, त्यांच्या वेबसाइटच्या पृष्ठांना भेट देता, तेव्हा पैसाबझार.कॉम तुमची माहिती संकलित करतात. जेव्हा तुम्ही पैसाबझार.कॉमवर रजिस्टर करता तेव्हा तुम्हाला तुमचे नाव, आडनाव, राज्य आणि निवासी शहर, ईमेल ॲड्रेस, जन्मतारीख आणि लिंग याबद्दल माहिती विचारली जाते. तुम्ही वेबसाइटवर रजिस्ट्रेशन आणि साइन इन केल्यावर तुम्ही आमच्यासाठी अज्ञात नसता. रजिस्ट्रेशन दरम्यान तुम्हाला तुमचा संपर्क क्रमांक देखील विचारला जातो आणि एसएमएस, सेवांबाबतच्या सूचना तुमच्या मोबाइलवर पाठविल्या जाऊ शकतात. म्हणून, रजिस्ट्रेशन करून तुम्ही पैसाबझार.कॉमला (त्यांचे व्यवसाय भागीदार आणि संलग्नित कंपन्यांसहित), जरी तुम्ही DND किंवा DNC किंवा NCPR सेवांतर्गत स्वतःला रजिस्टर केलेले असले तरीही, तुम्हाला तुमच्या लॉग इन तपशीलांबरोबरच प्रचारात्मक मेल व एसएमएस तसेच इतर कुठल्याही सेवा आवश्यकतांबाबत सूचना देणारी सामग्री आणि ईमेल पाठविण्याचा अधिकार देता. जोपर्यंत तुमचे अकाउंट निष्क्रिय केले जात नाही किंवा तुम्ही तुमची संमती काढून घेत नाही तोपर्यंत तुमची अधिकृतता वैध असेल. पैसाबझारची वेबसाइट तुमच्या संमतीच्या आधारे, सेवांचे सुलभीकरण तसेच तुम्ही निवडलेल्या विविध सेवांकरिता आमच्या

वेबसाइटचा सहजतेने वापर करण्याच्या उद्देशाने आणि लागू कायद्यांचे पालन करून कॅमेरासहित तुमच्या मोबाइलचा देखील वापर करू शकते.

**माहिती संकलित करण्याचा उद्देशः**

तुम्हाला सेवा सुलभतेने वितरित करण्यास, प्रदाने आणि तुमच्या अर्जांवर प्रक्रिया करण्यास, प्रॉडक्ट्स, सेवा व प्रचारात्मक ऑफर्सच्या संदर्भात तुमच्याशी संपर्क करण्यास आम्हाला आणि आमच्या व्यवसाय भागीदारांना मदत करते.

तुम्ही विचारलेल्या शंका किंवा केलेल्या विनंतींना उत्तरे देण्यासाठी आणि तुम्हाला दिलेल्या कुठल्याही सेवांच्या संदर्भातील तुमच्या तक्रारी/प्रश्न/समस्यांचे निराकरण करण्यासाठी.

आमच्या व्यवसाय भागीदारांबरोबर केलेल्या कुठल्याही करारासंबंधी असलेल्या आमच्या दायित्वाची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा अन्यथा पार पाडण्यासाठी.

विशेष प्रचारात्मक जाहिराती किंवा ऑफर्सबाबतची माहिती तुम्हाला पाठविण्यासाठी. आम्ही तुम्हाला नवीन वैशिष्ट्यांबद्दल किंवा प्रॉडक्ट्स/सेवांबाबत देखील सांगू शकतो. या आमच्या स्वतःच्या ऑफर्स किंवा प्रॉडक्ट्स/सेवा असू शकतात किंवा ज्यांच्यासोबत पैसाबझार.कॉम व्यावसायिकदृष्ट्या संलग्नित आहेत अशा तृतीय पक्षाच्या ऑफर्स किंवा प्रॉडक्ट्स/सेवा असू शकतात.

अंतर्गत विश्लेषण करण्यासाठी आणि तुम्हाला जाहिराती, शोध परिणाम यांसारख्या स्थान-आधारित सेवा आणि इतर वैयक्तिकृत सामग्री देण्याकरिता तुमच्या माहितीचा वापर होतो.

आमचा प्लॅटफॉर्म सुधारण्यासाठी, आमच्या वेबसाइटची फसवणूक किंवा दुरुपयोग टाळण्यासाठी किंवा शोधण्यासाठी आणि तृतीय पक्षांना आमच्या वतीने तांत्रिक, लॉजिस्टिकसंबंधी किंवा इतर कार्ये पाडणे शक्य होण्यासाठी या माहितीचा वापर होतो. तुमच्याकडून आम्हाला मिळालेली माहिती आणि तृतीय पक्षांकडून आम्हाला तुमच्याबाबत मिळालेली माहिती आम्ही एकत्रित करू शकतो.

तुम्हाला सूचना, पत्रे पाठविणे आणि ज्यांच्याबाबत तुम्हाला स्वारस्य असू शकते अशा सेवांची शिफारस करणे. आमची रेकॉर्ड्स अद्ययावत करणे आणि आमच्याकडील तुमच्या अकाउंट्सची देखभाल करणे, सामग्री आणि ग्राहकांची पुनरावलोकने प्रदर्शित करणे.

जेव्हा तुम्ही आम्हाला तुमचा संपर्क तपशील देता तेव्हा, तुम्हाला तुमच्या अकाउंटबद्दल सर्वसाधारण सूचना किंवा महत्त्वाच्या बातम्या पाठविण्यासाठी, तुमचा अभिप्राय किंवा मते तुमच्याकडून जाणून घेण्यासाठी आणि तुम्हाला स्वारस्य असू शकते अशी विशेष डील्स आणि ऑफर्ससंबंधीची अद्ययावत माहिती देण्यासाठी आम्ही तिचा वापर करू.

ग्राहकांचे दस्तावेज अपलोड करण्यासाठी अॅन्ड्रॉइड/iOS आणि वेबसाइटवर फाइल संग्रहित करण्याच्या अनुमती आमच्या भागीदारांकडून ग्राहकांच्या अर्जांवर प्रक्रिया करण्याकरिता प्राप्त केल्या जातात.
पैसाबझार वेबसाइट, तुमच्या संमतीच्या आधारे सेवांचे सुलभीकरण तसेच तुम्ही निवडलेल्या विविध सेवांकरिता आमच्या वेबसाइटचा सहजतेने वापर करण्याच्या व लॉगइन करण्याच्या उद्देशाने कॅमेरासहित तुमच्या मोबाइलचा देखील वापर करू शकते.

- या गोपनियता धोरणामध्ये आणि लागू असलेल्या कायद्यांच्या अनुपालनामध्ये अन्यथा तरतूद केल्यानुसार.

या वेबसाइटच्या किंवा आमच्या सेवांच्या काही वैशिष्ट्यांकरिता, तुम्ही आमच्या वेबसाइटवरील तुमच्या अकाउंट विभागाअंतर्गत दिलेली तुमची वैयक्तिकरित्या ओळखण्यायोग्य माहिती तुम्हाला सादर करणे आवश्यक राहील.

## 5. तृतीय पक्षांना माहिती देणे

-

पैसाबझार.कॉम व्यावसायिक उद्देशांकरिता तुमची माहिती कुणालाही अशा प्रकारे विकणार नाही किंवा भाड्याने देणार नाही किंवा अन्यथा उघड करणार नाही, जो या गोपनियता धोरणामध्ये निर्धारित केलेल्या आणि/किंवा इतर वचनबद्धतेंच्या विरूद्ध असेल. असे असले तरीही, या गोपनियता धोरणामध्ये निर्धारित केलेल्या उद्देशांकरिता आम्ही तुमची माहिती तृतीय पक्षांना देऊ शकतो, ज्यामध्ये आमची समूह कंपनी, कर्मचारी, एजंट, व्यवसाय भागीदार (बँका/एनबीएफसीज्), सीआयसीज्, ज्यांच्याशी आम्ही व्यावसायिकदृष्ट्या संलग्नित आहोत असे प्रदानांचे संकलनकर्ता व सेवा प्रदाते आणि आमच्या कुठल्याही संलग्नित कंपनी समाविष्ट आहेत.

ज्या दर्जाची काळजी पैसाबझारकडून घेतली जाते तेवढीच काळजी घेऊन आणि गोपनीयता बाळगून या तृतीय पक्षांनी तुमची माहिती हाताळणे आवश्यक आहे आणि या तृतीय पक्षांद्वारे तुमची कुठलीही माहिती

मिळविणे किंवा त्यावर प्रक्रिया करणे हे कराराच्या अटी, लागू कायदे आणि आमच्या सूचनांनुसार आहे आणि तुमच्या संमतीच्या अधीन आहे. या परिच्छेदाच्या हेतूंसाठी,"संलग्नित" चा अर्थ होईल, कुठल्याही व्यक्तीशी संबंधित, इतर कुठलीही व्यक्ती, जी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, अशा व्यक्तीला नियंत्रित करते किंवा व्यक्तीद्वारे नियंत्रित केली जाते किंवा तिच्याबरोबर सामान्य नियंत्रणाखाली असते. "नियंत्रण" या शब्दाचा, ("द्वारे नियंत्रित" आणि "सामान्य नियंत्रणाखाली" या त्याच्या सहसंबंधित अर्थांसह)अर्थ होईल, व्यवस्थापनाची किंवा व्यक्तींच्या धोरणांची दिशा निर्देशित करण्याच्या किंवा कारणीभूत ठरण्याच्या अधिकाराचा, सिक्युरिटीजचा मालकी हक्क किंवा भागीदारी किंवा इतर मालकीहक्काच्या हितसंबंधांच्या माध्यमातून, कराराद्वारे किंवा अन्यथा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे असलेला ताबा. "व्यक्ती" या शब्दामध्ये कोणतीही नैसर्गिक व्यक्ती, कॉर्पोरेशन, भागीदारी, मर्यादित दायित्व कंपनी, ट्रस्ट, असंघटित असोसिएशन किंवा इतर कोणतीही संस्था समाविष्ट आहे).

पैसाबझार.कॉमच्या व्यवसायाच्या कुठल्याही भागाच्या विक्रीच्या परिणामस्वरूप किंवा त्यांचे दुसऱ्या संस्थेबरोबर - ती संस्था जीवित नाही या आधारावर - झालेल्या विलिनीकरण, पुनर्रचना किंवा एकत्रीकरणाच्या परिणामस्वरूप, पैसाबझार.कॉम तुमची वैयक्तिकरित्या ओळखण्यायोग्य माहिती, समान अधिकार मिळालेल्या कुठल्याही उत्तराधिकारी व्यक्तीला (Successor-in-interest) देऊ शकतात आणि/किंवा हस्तांतरित करू शकतात.

आम्ही तुमच्या वैयक्तिक माहितीचे संकलन आणि वापर यावर मर्यादा ठेवतो. आम्ही अज्ञात किंवा एकत्रित वैयक्तिक माहिती तयार करू शकतो आणि असा डेटा केवळ वैयक्तिकरित्या ओळखण्यायोग्य नसलेल्या पद्धतीने उघड करू शकतो. अशा माहितीमुळे तुम्ही वैयक्तिकरित्या ओळखले जात नाही. तुमच्या अकाउंटची माहिती आणि इतर कुठलीही वैयक्तिकरित्या ओळखण्यायोग्य माहिती मिळविणे कठोरतेने प्रतिबंधित आहे आणि केवळ विशिष्ट अंतर्गत कार्यपद्धतींनुसार आणि या गोपनियता धोरणामध्ये निर्धारित केलेल्या उद्देशांकरिता आमच्या सेवा संचालित, विकसित किंवा सुधारित करण्यासाठी वापरली जाते. आमच्या सेवा तुम्हाला देणे शक्य व्हावे यासाठी आम्ही तृतीय पक्ष सेवा प्रदात्यांचा वापर करू शकतो आणि अशा तृतीय पक्षांनी, आम्ही त्यांचेबरोबर केलेल्या करारांच्या अंतर्गत, आम्ही त्यांना देत असलेल्या माहितीची गोपनियता राखणे आवश्यक आहे.

आम्ही तुमची पूर्व लेखी संमती न घेता, कायद्याअंतर्गत अधिकारप्राप्त असलेल्या सरकारी संस्थांना, ओळख सत्यापित करण्याच्या उद्देशाकरिता किंवा सायबर घटना, खटला आणि शिक्षा यासहित गुन्ह्यांचा प्रतिबंध, शोध, तपास याकरिता किंवा जेथे कायदेशीर दायित्वाचे अनुपालन करण्यासाठी माहिती उघड करणे

आवश्यक आहे अशा ठिकाणी तुमची माहिती देऊ शकतो. जर अशाप्रकारे आवश्यक असल्यास, तुम्ही वेबसाइटला तुमची माहिती लागू असलेल्या कायद्याअंतर्गत उघड करण्यास स्वीकृती आणि संमती देता.

कर्जदाते, बँका, क्रेडिट कार्ड प्रदाते अशा तृतीय पक्षांद्वारे देऊ करण्यात आलेली कर्जे, क्रेडिट कार्ड्स, म्युच्युअल फंड अशी असंख्य प्रॉडक्ट्स/सेवा वेबसाइटवर आहेत. जर तुम्ही या वेगवेगळ्या प्रॉडक्ट्स किंवा सेवांकरिता अर्ज करण्याचे, ह्या प्रदात्यांना माहिती देण्याचे ठरवल्यास, तुमच्या माहितीचा त्यांचा वापर या वेबसाइटच्या गोपनियता धोरणाबरोबरच त्यांच्या गोपनियता धोरणांद्वारे नियंत्रित केला जाईल. त्यांच्या गोपनियता धोरणांकरिता पैसाबझार.कॉम जबाबदार नाही. जेव्हा तुम्ही या तृतीय पक्षांच्या प्रॉडक्ट्स किंवा सेवांकरिता अर्ज करता तेव्हा त्यांच्या वेबसाइटला भेट देऊन या तृतीय पक्षांनी/प्रदात्यांनी अंगिकारलेली गोपनियता धोरणे आणि कार्यप्रणाली तुम्ही वाचावी असे आम्ही आवर्जून सांगतो. या तृतीय पक्षांच्या वेबसाइट्सच्या गोपनियता धोरणांमधील सामग्री किंवा वापरासाठीच्या अटी इ. करिता पैसाबझार कुठलीही जबाबदारी घेत नाही.

जर तुम्ही आमच्या मोबाइल ॲपद्वारे आमच्या म्युच्युअल फंड प्रॉडक्टमध्ये गुंतवणूक करत असाल तर तुम्ही खालील प्रगटीकरणास सहमती देताः

गुगल एपीआयज् कडून प्राप्त झालेल्या माहितीचा पैसाबझारचा वापर आणि त्या माहितीचे इतर कुठल्याही ॲपवर हस्तांतरण याकरिता मर्यादित वापराच्या आवश्यकतांसह, गुगल एपीआय सर्व्हिसेस युजर डेटा पॉलिसीचे पालन होईल. ज्या दीर्घ कालावधीमध्ये एकापेक्षा अनेक चॅनेल/प्लॅटफॉर्मद्वारे केलेल्या असू शकतातअशा म्युच्युअल फंडाच्या गुंतवणुकींवर लक्ष ठेवण्यासपैसाबझार ॲप मदत करते,जे करणे अन्यथा ग्राहकांसाठी कठीण ठरू शकते. येथे, म्युच्युअल फंडामध्ये केलेल्या सर्व गुंतवणुकी एकाच ठिकाणी पाहता आणि त्यावर लक्ष ठेवता येऊ शकणे ही ग्राहकाची मूलभूत आवश्यकता आहे.

ही सेवा देणे शक्य होण्यासाठी, ग्राहकाची संमती घेतल्यानंतर, पैसाबझार वेबसाइट दर महिन्याला गुंतवणूकदार/ग्राहकाकडून आलेल्या केवळ म्युच्युअल फंड सीएएसचे विवरण असलेल्या ईमेल वाचते (ज्यामध्ये सर्व म्युच्युअल फंड गुंतवणुकींचा तपशील असतो) आणि ग्राहकाला पूर्ण आणि व्यापक असा म्युच्युअल फंडचा डॅशबोर्ड एकाच स्क्रीनवर उपलब्ध करून देते. यामुळे ग्राहकाला सुधारित सेवेचा अनुभव मिळण्यासोबतच त्यांना त्यांच्या सर्व सक्रीय म्युच्युअल फंडाच्या गुंतवणुकी एकाच ठिकाणी तपासण्यास, लक्ष ठेवण्यास आणि त्यांची तुलना करण्यास मदत होते, ज्यामुळे त्यांना त्याबाबत माहिती प्राप्त होऊन आर्थिक निर्णय घेणे शक्य होते,

## 6. डेटा संग्रहित करणे

-

पैसाबझार तुमची वैयक्तिक माहिती केवळ भारतामध्ये असलेल्या सर्व्हर्सवर संग्रहित करतात. पैसाबझार तुमच्या वैयक्तिक माहितीसहित इतर माहिती स्वतःजवळ राखून ठेवू शकतात, कारण तुम्ही चौकशी केलेल्या किंवा निवड केलेल्या प्रॉडक्टसाठी तुम्हाला सेवा देण्याकरिता आणि वरील उद्देशाकरिता किंवा आमच्या व्यावसायिक भागीदारांसोबतच्या आमच्या करारांमध्ये अनिवार्य असेल तोपर्यंत ती आवश्यक असू शकते. भारतातील लागू असलेले कायदे/नियामक आवश्यकतांचे पालन करण्याच्या अधीन राहून माहिती राखून ठेवली जाते.

खालील परिस्थितींमध्ये पैसाबझार तुमची माहिती दीर्घ कालावधीकरिता राखून ठेवू शकतातः (1) कायद्याअंतर्गत होणाऱ्या कुठल्याही तपासण्यांच्या आवश्यकतांकरिता किंवा कुठलीही न्यायालये/ट्रिब्युनल/फोरम/आयोग इ. समोरच्या कुठल्याही आवश्यकतांकरिता, (2) आमची प्रॉडक्ट्स/सेवा वाढविण्यासाठी/सुधारण्यासाठी आणि (3) व्यावसायिक भागीदारांबरोबर केलेल्या करारांतर्गतच्या आवश्यकतांकरिता.

## 7. ऑनलाइन संकलित केलेल्या आणि वापरलेल्या तुमच्या वैयक्तिक माहितीवरील तुमचे नियंत्रण म्हणजे काय

-

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की आम्ही वापरत असलेली तुमच्याबाबतची माहिती आम्हाला, तुम्हाला लाभदायक प्रॉडक्ट्स, सेवा आणि अनुभव देण्यामध्ये मदत करते. तुमची वैयक्तिक नसलेली माहिती ऑनलाइन कशी संकलित होते आणि कशी वापरली जाते, यावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता तुमच्याकडे आहे.

तुमच्या संवेदनशील वैयक्तिक माहितीसहित (जसे की तुमची आर्थिक माहिती) कुठली वैयक्तिक माहिती तुम्ही आम्हाला द्याल याची निवड करण्याची तसेच तृतीय पक्षांना तुमची माहिती देण्यास प्रतिबंधित करण्याची क्षमता देखील तुमच्याकडे आहे, तथापि, कृपया लक्षात घ्या की याचा परिणाम तुम्ही निवडलेल्या प्रॉडक्ट्सच्या/सेवांच्या तुमच्या अखंडित वापरावर होऊ शकतो. तथापि, तुम्हाला विचारण्यात आलेली तुमची सर्व अनिवार्य माहिती आणि डेटा न देण्याचा पर्याय तुम्ही निवडल्यास तुम्ही ज्या सेवांसाठी सबस्क्राइब केले आहे अशा सेवा आम्ही तुम्हाला देऊ शकणार नाही.

आमचा विश्वास आहे की, ईमेल/एसएमएसद्वारे तुम्हाला कुठल्या प्रकारची माहिती मिळते ह्याची निवड तुम्हाला करता यावी. जर तुम्ही ईमेल/एसएमएसद्वारे मार्केटिंगसंबंधित सामग्री मिळवू इच्छित नसाल तर फक्त तुमच्या अकाउंटच्या संपर्क माहितीमध्ये तुमचे प्राधान्य किंवा “निवड रद्द करा” सूचित करा किंवा आमच्या मार्केटिंग ईमेल्समध्ये दिलेली लिंक अनसबस्क्राइब करा, तसेच तुम्ही care@paisabazaar.com येथे आम्हाला लिहू देखील शकता. कृपया लक्षात घ्या की तुमच्या विनंतीनुसार प्रक्रिया पार पाडण्याकरिता सुमारे 10 दिवस लागू शकतात. कृपया लक्षात राहू द्या की तुम्ही निवड रद्द केल्यानंतरही आम्ही तुम्हाला ईमेल/एसएमएस/फोन कॉलद्वारे तुम्ही आमच्याकडून घेतलेल्या सेवांबद्दल सूचित करत राहू.

तुम्ही आम्हाला दिलेल्या माहितीचे पुनरावलोकन, वेबसाइटवर असलेल्या तुमच्या अकाउंटला लॉगइन करून करू शकता आणि तुम्ही आम्हाला दिलेली माहिती किंवा डेटा अचूक आणि/किंवा अपूरा नाही हे सुनिश्चित करण्यासाठी तुमची कुठलीही वैयक्तिक किंवा संवेदनशील वैयक्तिक माहिती दुरुस्त करू शकता किंवा सुधारित करू शकता. तुम्ही पैसाबझार.कॉमला किंवा कुठल्याही तृतीय पक्षाला दिलेल्या तुमच्या कुठल्याही वैयक्तिक माहितीच्या किंवा संवेदनशील वैयक्तिक डेटाच्या किंवा माहितीच्या अस्सलपणाकरिता पैसाबझार.कॉम जबाबदार नाही.

## 8. संमती मागे घेणे

-

तुम्हाला जर असे वाटले की तुमची वैयक्तिक माहिती आम्ही आमच्याकडे ठेवणे आवश्यक नाही किंवा तुमच्या मते तुमच्या ज्या वैयक्तिक माहितीवर प्रक्रिया करण्याचा आम्हाला अधिकार नाही अशी माहिती तुम्ही आम्हाला डीलिट करण्यास किंवा काढून टाकण्यास सांगितली तर आम्ही ग्राहकाची अशी माहिती नष्ट करू किंवा डीलिट करू. तुम्ही आमच्या सेवांचा लाभ घेताना किंवा

अन्यथा, consentrevocation@paisabazaar.com. येथे लेखी स्वरूपात कळवून, तुमचा संवेदनशील वैयक्तिक डेटा किंवा माहिती संकलित करण्यासाठी आणि वापरण्यासाठी आम्हाला यापूर्वी दिलेली संमती मागे घेऊ शकता. तथापि, तुम्ही अशी संमती मागे घेतल्यास, ज्याकरिता ही माहिती मागविली होती त्या सेवा तुम्हाला देणे थांबविण्याचा पर्याय पैसाबझार.कॉमकडे असेल. अशा घटनेत, कुठल्याही सेवेकरिता दिलेले कुठलेही शुल्क परत मिळण्यासाठी तुम्ही पात्र नसाल आणि त्याकरिता वेबसाइट कुठल्याही प्रकारे उत्तरदायी असणार नाही यास तुम्ही सहमती देता.

आमच्याकडून आणि/किंवा आमच्या भागीदारांकडून प्रॉडक्ट्सच्या संदर्भातील सेवा, पैसे परत करणे इ. उद्देशांकरिता आणि कुठल्याही लागू कायद्यांतर्गत असलेल्या आवश्यकतांनुसार देखील हा डेटा राखून ठेवणे आवश्यक असू शकते. आम्ही आश्वासन देतो, की अशी राखून ठेवलेली माहिती सायबर सुरक्षेच्या सर्व नियमांचे पालन करून संरक्षित केली जाईल.

## 9. लॉग फाइल्स

-

बहुतांश मानक वेबसाइट्सप्रमाणेच आम्ही लॉग फाइल्स वापरतो. या माहितीमध्ये, इंटरनेट प्रोटोकॉल (आयपी) ॲड्रेस, ब्राउजरचा प्रकार, इंटरनेट सेवा प्रदाता (आयएसपी), रेफरिंग/एक्झिट पृष्ठे, प्लॅटफॉर्मचा प्रकार, दिनांक/वेळेचा स्टँप आणि ट्रेंड्सचे विश्लेषण करण्यासाठी, साइटचे प्रशासन करण्यासाठी, वापरकर्त्यांच्या एकूण कृतींचा मागोवा घेण्यासाठी आणि एकत्रित वापराकरिता विस्तृत लोकसंख्याशास्त्रीय माहिती गोळा करण्यासाठी क्लिक्सची संख्या, यांचा समावेश असू शकतो. ही आपोआप संकलित झालेली लॉग माहिती आम्ही तुमच्याबद्दल संकलित करत असलेल्या इतर माहितीबरोबर एकत्र करू शकतो. तुम्हाला देऊ करीत असलेल्या सेवा सुधारण्यासाठी, मार्केटिंग, विश्लेषणात्मक किंवा साइटची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आम्ही हे करतो.

## 10. डेटाची सुरक्षितता

-

पैसाबझार.कॉम ही एक ISO/IEC 27001:2013 प्रमाणित संस्था जी माहितीच्या सुरक्षिततेसाठी लागू असलेल्या मानकांचे पालन सुनिश्चित करते आणि हे समजते की तुमच्या माहितीची गोपनियता, अखंडितता आणि उपलब्धता ही आमचा व्यवसाय चालविण्यासाठी आणि आमच्या स्वतःच्या यशासाठी महत्त्वपूर्ण आहे. आम्ही तुमच्याकडून संकलित करत असलेली माहिती संरक्षित करण्यासाठी नेहमीच योग्य त्या तांत्रिक आणि संस्थात्मक सुरक्षा उपाययोजना करतो. माहितीचा अनधिकृत किंवा बेकायदेशीर वापर किंवा माहितीमध्ये बदल करणे तसेच कुठलेही अपघाती नुकसान, नाश किंवा माहितीची हानी यांपासून माहितीचे संरक्षण करण्यासाठी आम्ही एकापेक्षा अधिक इलेक्ट्रॉनिक, प्रक्रियात्मक आणि भौतिक सुरक्षा उपाययोजनांचा वापर करतो. डेटाच्या सुरक्षेच्या कुठल्याही संशयित उल्लंघनाचा सामना करण्यासाठी आम्ही उचित सुरक्षा उपाययोजना केल्या आहेत. तथापि, इंटरनेटवर प्रसारण करण्याची कुठलीही पद्धत किंवा इलेक्ट्रॉनिक संग्रहाची पद्धत 100% सुरक्षित नाही. त्यामुळे, आम्ही तिच्या संपूर्ण सुरक्षेची हमी देऊ शकत नाही. याशिवाय, तुमचा लॉगइन आयडी आणि पासवर्ड यांची गोपनियता आणि सुरक्षितता राखण्याची जबाबदारी तुमची आहे आणि कुठल्याही तृतीय पक्षाला ही क्रीडेन्शिअल्स तुम्ही देऊ शकत नाही.

## 11. तृतीय पक्ष जाहिरातदार आणि इतर वेबसाइटच्या लिंक्स

-

**तृतीय पक्ष जाहिराती**

जेव्हा तुम्ही आमच्या वेबसाइटला भेट देता तेव्हा जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी आम्ही तृतीय पक्ष जाहिरात कंपनी आणि/किंवा जाहिरात एजन्सींचा वापर करू शकतो. या कंपनी, या वेबसाइटवर आणि तृतीय पक्ष वेबसाइट्सवर, ज्याविषयी तुम्हाला स्वारस्य असू शकते अशा वस्तू आणि सेवांविषयीच्या जाहिराती पुरविण्यासाठी, या वेबसाइटला तुम्ही दिलेल्या भेटींबाबतच्या माहितीचा (तुमचे नाव, पत्ता, ईमेल ॲड्रेस किंवा फोन क्रमांक वगळून) वापर करू शकतात.

इंटरनेटवर आणि काही वेळा या वेबसाइटवर आमच्या वतीने जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी आम्ही तृतीय पक्ष सेवा प्रदात्यांचा वापर करतो. तुम्ही वेबसाइटला दिलेल्या भेटींबाबतची आणि आमची प्रॉडक्ट्स् व सेवांबाबत साधलेल्या संपर्काबाबतची अज्ञात माहिती ते संकलित करू शकतात. वस्तू आणि सेवांकरिता लक्ष्य केलेल्या जाहिरातींकरिता ते या वेबसाइटला आणि इतर वेबसाइट्सना दिलेल्या तुमच्या भेटींबाबतच्या माहितीचा देखील वापर करू शकतात. ही अज्ञात माहिती पिक्सल टॅगचा वापर करून संकलित केली जाते, जे बहुतांश प्रमुख वेबसाइट्सद्वारे वापरले जाणारे उद्योग मानक तंत्रज्ञान (Industry standard technology) आहे. या प्रक्रियेमध्ये वैयक्तिकरित्या ओळखण्यायोग्य कुठलीही माहिती संकलित केली जात नाही किंवा वापरली जात नाही.

**इतर वेबसाइट्सच्या लिंक्सः**
आमच्या बँकिंग आणि गैर-बँकिंग भागीदारांशी संबंधित असलेल्या इतर काही साइट्स पैसाबझार.कॉम आणि इतर संलग्नित कंपन्यांशी जोडलेल्या असू शकतात. त्या साइट्सना तुम्ही दिलेली माहिती ही आमची मालमत्ता किंवा जबाबदारी नाही. या संलग्नित साइट्सच्या गोपनियता कार्यप्रणाली भिन्न असू शकतात आणि जेव्हा तुम्ही त्या वेबसाइट्सना भेट देता तेव्हा तुम्ही त्यांची गोपनियता धोरणे वाचावी असे आम्ही आवर्जून सांगतो. या तृतीय पक्ष वेबसाइट्सच्या गोपनियता धोरणांच्या किंवा वापराच्या अटींच्या सामग्रीकरिता पैसाबझार कुठलीही जबाबदारी घेत नाही.

**12. या गोपनियता धोरणातील बदल**

-

पैसाबझार.कॉम त्यांच्या एकमात्र विवेकाधिकारात, या धोरणामध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार राखून ठेवतात. आमच्या माहिती कार्यप्रणालीतील बदलांसंदर्भातविचार करण्यासाठी आम्ही हे गोपनियता धोरण

अद्ययावत करू शकतो. तुम्ही वेळोवेळी पुनरावलोकन करावे असे आम्ही आवर्जून सांगतो. खालील लागू होण्याची तारीख तपासल्याने, तुम्ही विवरणाचे जे शेवटचे पुनरावलोकन केले तेव्हापासून त्यात बदल झाले आहेत की नाही हे तुम्हाला निश्चित करता येते.

## 13. नोडल तक्रार अधिकारी

-

डिजिटल-कर्जासंबंधीच्या ग्राहकांच्या कुठल्याही तक्रारींचे निवारण करण्यासाठी कंपनीने नोडल तक्रार अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. नोडल तक्रार अधिकाऱ्याचे नाव आणि संपर्काचा तपशील येथे खाली दिला आहेः

**नावः** श्रीमती ज्योत्स्ना पोपळी

**पत्ताः** पैसाबझार मार्केटिंग अँड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिडेट, प्लॉट क्र. 135, सेक्टर-44, गुरुग्राम-122001, हरियाणा

**ईमेलः** servicehead@paisabazaar.com

आमच्या गोपनियता धोरणाबद्दल तुमचे काही प्रश्न, समस्या किंवा सूचना असल्यास, आमच्या Contact Us पृष्ठावरील किंवा care@paisabazaar.comयेथे दिलेली संपर्क माहिती वापरून आमच्याशी संपर्क साधू शकता.

## 14. डेटा तक्रार अधिकारी

-

तुम्ही पैसाबझार.कॉमला दिलेल्या कुठल्याही प्रकारच्या माहितीच्या/डेटाच्या प्रक्रियेच्या संदर्भात तुमच्या कुठल्याही तक्रारी असतील किंवा त्यासंदर्भातील कुठलीही तफावत दूर करू इच्छित असल्यास कृपया आमच्या डेटा तक्रार अधिकाऱ्याशी संपर्क साधा. तक्रार अधिकाऱ्याचे नाव आणि संपर्काचा तपशील येथे खाली दिला आहेः

**नावः** श्री. मुकेश शर्मा

**पदनामः** संचालक-टेक्नॉलॉजी आणि डेव्हलपमेंट

**पत्ताः** पैसाबझार मार्केटिंग अँड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिडेट, प्लॉट क्र. 135, सेक्टर-44, गुरुग्राम-122001, हरियाणा

**टेलीफोनः** 0124 - 4562900

**फॅक्सः** 0124 - 4562902

**ईमेलः** grievance-officer@paisabazaar.com

आमच्या गोपनियता धोरणाबद्दल तुमचे काही प्रश्न, समस्या किंवा सूचना असल्यास, आमच्या Contact Us पृष्ठावरील किंवा care@paisabazaar.comयेथे दिलेली संपर्क माहिती वापरून आमच्याशी संपर्क साधू शकता.

**हे गोपनियता धोरण दि. 3 ऑक्टोबर 2022 रोजी शेवटचे अद्ययावत केले गेले.**